# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

## (पोलीस वार्तापत्र)

## सायंकाळ

---

### दिनांक 12.06.2019 बुधवार

### (गुन्हे)

**1) पो.स्टे कळमणा, सोनगाव – प्राणांतिक अपघात :**

**अ) कळमणा** – दिनांक 11.06.2019 चे 1930 वा चे सुमारास सुरेश आसाराम पटले, वय 37 वर्ष रा. गुलमोहर नगर, नागपूर हे आपली बजाज डिस्कव्हर गाडी क्र. सीजी/12/एएच/7221 ने जात असतांना पो.स्टे. कळमणा हद्दीत डिप्टी सिंग्नल रोड रेल्वे क्रॉसिंग जवळ ट्रक क्र. आरजे/07/जीडी/4964 च्या आरोपी चालकाने सुरेश यांना धडक मारून त्यांचे मरणास कारणीभूत ठरला. याप्रकरणी फिर्यादी तिलस आसाराम पटले, वय 50 वर्ष बेलगाव रमगडी बालाघाट यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. कळमणा येथे पोउपनि इंगोले, 9021172041 यांनी आरोपी चालकाविरूध्द कलम 279,304(अ) भादंवि अन्वये गुन्हा नोदविला आहे.

**ब) सोनेगाव** – दिनांक 12.06.2019 चे 1345 वा चे सुमारास इशांत नारायणराव खोडे, वय 16 वर्ष व सोबत इंदु काशीनाथ खोडे, वय 70 वर्ष दोन्ही रा. चिचभवन काचुरे ले आउट, नागपूर व आदित्य रामभाउ निंबाळकर, वय 20 वर्ष रा. एमआयजी कॉलनी, त्रिमुर्ती नगर, नागपूर हे तिबल सिट ॲक्टिव्हा गाडी क्र. एमएच/31/इडब्ल्यु/3831 ने जात असतांना पो.स्टे. सोनेगाव हद्दीत नागपूर वर्धा रोड चिंचभवन पुलावर अज्ञात चारचाकी वाहनाच्या आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणाने चालवून यांचे ॲक्टिव्हा गाडीला मागून धडक मारून इशांत व इंदु याचे मरणास कारणीभुत ठरला तसेच आदित्य यास गंभीर जख्मी केले. याप्रकरणी पोस्टे. सोनेगाव येथे पोहवा सुभाष, 9823030719 यांनी आरोपी चालकाविरूध्द कलम 279,337,338,304(अ) भादंवि सहकलम 134,177 मोवाका अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**2) पो.स्टे. एमआयडीसी,गिट्टिखदान – फसवणुक :**

**अ) एमआयडीसी** – दिनांक 01.03.2016 ते दिनांक 01.06.2017 दरम्यान पो.स्टे. एमआयडीसी हद्दीत अमर नगर नागपूर येथे राहणारे फिर्यादी अनिरूध्द रामचंद्र भोवते, वय 46 वर्ष यांचे कडुन आरोपी सुरेश सखाराम मेश्राम, वय 50 वर्ष रा. बाबा त्रिमुर्ती हाउसिंग सोसायटी, वार्ड क्र. 41, दवलामेठी, आठवामैल, नागपूर याने फिर्यादीचे मुलाचे नावाचे भारतीय जिवन बिमा पॉलसी चे 6 हप्त्याचे एकुण 17,436 रू घेवून ते पैसे जमा न करता स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता वापरून फिर्यादीचा विश्वासघात केला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. एमआयडीसी येथे सपोउपनि घाटे, 9764083180 यांनी आरोपीविरूध्द कलम 420,406 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**ब) गिट्टिखदान** – दिनांक 12.04.2019 चे 1000 वा चे सुमारास पो.स्टे. गिट्टिखदान हद्दीत महेश नगर, शिवमंदीर जवळ राहणा–या फिर्यादी शालिनी लक्ष्मण कांबळे, वय 37 वर्ष यांचे सोबत आरोपी मोहम्मद इमरान नुर मोहम्मद खान वय 39 वर्ष रा. भिवंडी, शिवाजी नगर, मुंबई याने फेसबुकवर ओळख करून वेळोवेळी चाटिंग करून रॉ एजंट असल्याची खोटी बतावणी करून फिर्यादीस लग्नाचे आमिष देवून तसेच फिर्यादीचे बहिणीचे पैसे काढुन देतो व फिर्यादीचे भावाला नोकरी लावून देतो असे म्हणुन नागपूर मध्ये येवून फिर्यादीकडुन एकुण 30,000 रू घेवून फिर्यादीचे फसवणुक केली. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. गिट्टिखदान येथे सपोनि गायकवाड, 8975752531 यांनी आरोपीविरूध्द कलम 419,420 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे

**3) पो.स्टे. कोतवाली – जबरी संभोग :**

दिनांक 25.08.2017 ते दिनांक 12.06.2019 चे 1000 वा दरम्यान पोस्टे. कोतवाली हद्यीत राहणा–या फिर्यादी यांची 05 वर्षीय अल्पवयीन मुलगी हिचे सोबत शेजारी राहणारा 13 वर्षीय विधिसंघर्ष बालक याने लैगिक अत्याचार केला. तसेच कोणाला काही सांगितल्यास मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. कोतवाली येथे पोउपनि टोपले, 8999498710 यांनी कलम 376(ए),(बी)(एन), 506 भांदवि सहकलम 4 पोक्सो ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पो.स्टे. नंदनवन, कळमणा, गणेशपेठ, वाडी, एमआयडीसी, प्रतापनगर, सोनेगाव :**

**1) नंदनवन** – दिनांक 11.06.2019 चे 1553 वा चे सुमारास अंदाजे 65 वर्ष वयोगटातील एक अनोळखी इसम हा पो.स्टे. नंदनवन हद्यीत सोनबाजी काली देवता मंदीर छत्तरपुर तरोडी येथे मंदीराच्या ओटयावर मृत अवस्थेत मिळून आला. याप्रकरणी फिर्यादी अरविंद हरीभाउ फलझले, वय 35 वर्ष रा. तरोडी, यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. नंदनवन येथे सपोउपनि ठाकुर, 8482851040 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली.

**2) कळमणा** – दिनांक 12.06.2019 चे 0845 वा चे सुमारास अंदाजे 30 ते 35 वर्ष वयोगटातील एक अनोळखी इसम हा पो.स्टे. कळमणा हद्यीत रेल्वे क्रॉसिंग पवनगाव नाका नं. 4 येथे रेल्वेची धडक लागल्याने मरण पावला. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. कळमणा येथे पोहवा प्रभाकर, 9037348716 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

**3) गणेशपेठ** – दिनांक 12.06.2019 चे 0715 वा चे पुर्वी दशरथ मारोतराव कराडे, वय 57 वर्ष रा. चक्रपाणी नगर, नागपूर हे पो.स्टे. गणेशपेठ हद्यीत राहुल कॉम्पलेक्स कडे जाणा–या रोडवर मृत अवस्थेत मिळून आले. याप्रकरणी फिर्यादी शॉमवेल शालुमल भंडारकर, वय 38 वर्ष रा. पांढराबोळी, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. गणेशपेठ येथे मपोउपनि मोकासे, 8580850350 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

**4) वाडी** – दिनांक 12.06.2019 चे 0600 वा चे सुमारास पोस्टे. वाडी हद्यीत गणेश नगर झोपंडपट्टी, नागपूर येथे राहणा–या सौ. दिक्षा रोशिमकुमार गोंडाणे, वय 33 वर्ष यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता गजबे हॉस्पिटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी फिर्यादी रोशिमकुमार जयराम गोंडाणे, वय 47 वर्ष यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. वाडी येथे पोउपनि कावनपुरे, 9766201514 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

**5) वाडी** – दिनांक 11.06.2019 चे 1000 वा ते दिनांक 12.06.2019 चे 1100 वा दरम्यान अमरलाल रामकिसन नयन, वय 50 वर्ष रा. जिंद, हरीयाणा हा ट्रक ड्रायव्हर असुन ते पो.स्टे. वाडी हद्यीत जवाहरलाल नेहरू शाळेमागे ट्रक क्र. एमएच/40/बीजी/9493 च्या कॅबिन मध्ये मृत अवस्थेत मिळून आले. याप्रकरणी फिर्यादी अतिउल्ला खान वकील खान वय 45 वर्ष रा. वार्ड क्र. 3, कळमेश्वर, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. वाडी येथे पोउपनि कावनपुरे, 9766201514 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

**6) एमआयडीसी** – दिनांक 12.06.2019 चे 1130 वा चे सुमारास पो.स्टे. एमआयडीसी हद्यीत इसासनी शांतीनगर येथे राहणारी प्रिया शैलेश बोरकर, वय 28 वर्ष हिला कुलरचा करंट लागल्याने मरण पावली. याप्रकरणी फिर्यादी सुनिल दामाजी मौजे, वय 24 वर्ष रा. इसासनी, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. एमआयडीसी येथे सपोउपनि घाटे, 9764083180 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

**7) प्रतापनगर** – दिनांक 03.06.2019 चे 1100 वा चे सुमारास अंदाजे 40 ते 45 वर्ष वयोगटातील अनोळखी इसम हा पो.स्टे. प्रतापनगर हद्यीत छत्रपती चौक येथे आजरी अवस्थेत मिळून आला त्याला उपचाराकरीता मेडिकल हॉस्पिटल येथे भरती केले असता उपचारादरम्यान 12.06.2019 चे 0800 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. प्रतापनगर येथे पोउपनि केवती, 9881126757 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

**8) सोनेगाव** – दिनांक 12.06.2019 चे 0900 वा चे सुमारास आंनदा हरीपत सरकार, वय 39 वर्ष रा. शक्ती नगर, प.बंगाल हे सुपरवायझर असून पो.स्टे. सोनेगाव हद्यीत महेद्रा ब्रुमडेल रेसिडेन्सी ब्लॉक सी/3 फ्लॅट नं. 104, येथे मृत अवस्थेत मिळून आले. याप्रकरणी फिर्यादी सागर दत्तात्रय पडोले, वय 31 वर्ष रा. प्रेरणा सोसायटी, मनिष नगर, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. सोनेगाव येथे पोहवा सुभाष, 9823030719 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

(ईतर)

1) पो.स्टे. तहसिल पोलीसांची कामगिरी :

मा. पोलीस आयुक्त नागपूर शहर यांनी दिलेल्या वॉश आउट ऑपरेशन दरम्यान पोलीस स्टेशन हद्दीत पाहिले असलेले आरोपी, अवैद्यधंदे, हिस्ट्रीशिटर शेध मोहिम दरम्यान तपास पथकांतील प्रमुख सपोनि रामदास पाअील तपासपथकातील कर्मचारी पोहवा किशोर मंहत, प्रमोद शनिवारे, नापोशि अनिल चतुवेर्दी, सचिन टापरे, शंभुसिंग किरार, राजेश धेपटे, सुरज ठाकुर यांचे सह पोस्टे तहसिल हद्यीत पेट्रोलींग करीत असतांना पोहवा किशोर महंत यांना भगवाघर चौकात 1545 वा गुप्तबातमीव्दारा मार्फत माहिती मिळाली की, एक ईसम हा मोमीनपुरा चौकात संशईतरित्या वावरत आहे. असे माहिती वरून तात्काळ  नमुद पोलीस स्टाफसह मोमिनपुरा चौकात जावून मिळालेल्या माहिती वर्णनानुसार सदर ईसमास ताब्यात घेवून नाव व पत्ता विचारले असता सदर बालका हा विधीसंघर्ष वय 16 वर्ष असुन सदर बालकावर वाजवी दाट संशय आल्याने त्या विश्वासात घेवून विचारपुस केली असता त्यांनी सांगितले कि दिनांक 01.06.2019 रोजी त्यांनी आपल्या साथीदारासह पोलीस स्टेशन कोतवाली हद्यीत बॅग चोरी केल्याचे सांगितले वरून पोस्टे कोतवाली येथे संपर्क साधुन विचारपुस केली असता सदर बाबात पोस्टे कोतवाली येथे अप क्र. 177/19 कलम 379,34 भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे माहिती पडल्याने सदर विधीसंघर्ष बालकास पुढील तपासकामी पोलीस स्टेशन कोतवाली येथील स्टाफच्या ताब्यात देण्यात आले.

सदरची कारवाई वपोनि श्री. अजयकुमार मालविय, गुन्हे प्रकटीकरण पथक प्रभारी सपोनि रामदास पाटील, पोहवा किशोर महंत, प्रमादे शनिवारे, नापोशि अनिल चतुर्वेदी, सचिन टापरे, पोशि किरार, राजेश धेपटे, सुरज ठाकुर यांनी केली आहे.

2) पोलीस उपआयुक्त, परि. क्र 4 पथकाची कामगिरी :

दिनांक 27.05.2019 रोजी संत्यम सभागृह, उमरेड नागपूर येथे फिर्यादी हया नातेवाईक मुलीचे लग्नास गेल्या होत्या. त्यांच्या मुलीस तहान लागल्याने त्यांचे कडील बॅग बसल्या ठिकाणी ठवून पाणी घेण्यासाठी गेल्या व परत येवून पाहीले असता रोख रक्कम, चांदीचे दागीने आणि मोबाईल एकुन अंदाजे किंमती रुपये 40,000 मुद्येमाल असलेली बॅग चोरीस गेल्याचे लक्षात आले. उमरेड पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारी नुसार नमुद गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सत्यम सभागृहातील सीसीव्ही मध्ये एक संशईत महिला फिर्यादी यांची बॅग चोरी करून घेवून जात असतांना आढळून आल्याने उमरेड पोलीसांनी सदरचे फुटेज विविधी पोलीस गृप मध्ये ाकले होते. पोलीस उपआयुक्त परि क्र. 4, नागपूर शहर याच्या पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी फुटेज मध्ये दिसत असलेल्या महिलेची ओळखी पटवून तिचे हालचालीवर पाळत ठेवून दिनांक 12.06.2019 रोजी नमु संशईत महिलेस ताब्यात घेवून पुढील तपास करीता उमरेड पोलीस स्टेशनच्या स्वाधीन केले आहे.

नमुद महिला विविध लग्न कार्यालयात दर्जेदार कपडे घालून एकटी अथवा स्वतःच्या मुलासह लग्न कार्यात सहभागी होवून अेळाळणी करून नजर चुकवून नवरी मुलीस नातेवाईक आणि मित्र मंडळी कढुन आलेल्या रूपये पाकिटाची चोरी अथवा इतर मौल्यवान वस्तु चोरी करण्याचे सवईच आहे. ताब्यात घेण्यात आलेली महिला व तिचे मुलाच्या विरोधात नंदनवन, सिताबर्डी, बजाजनगर येथे सन 2015 ते 2019 दरम्यान 5 गुन्हे दाखल आहेत. तसेच तिचे दोन्ही मुले सुध्दा गुन्हेगारी प्रवृत्तीचे असून त्यो विरोधात पोलीस उपआयुक्त, परि. क्र. 4, कार्यालयाकडुन हद्यपारीची कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस उपायुक्त, परि क्र.4, नागपूर शहर श्री. राजतिलक रौशन, याचें मार्गदर्शनाखाली पोउपनि के.पी. मगर, पोहवा विलास चोबितकर, सिध्दार्थ पाटील, शैलेष बडोदेकर, मपोहवा जयश्री ढोक, भगवतीकुमार ठाकुर, आशिष राउत, मपोषि वैशाली गि–हे, दुर्गा वरखडे, यांनी कौशल्याचा वापर करून गुन्हा उघडकीस आणला आहे.

3) शहरातील नाईट राऊंड अधिकारी बाबत :–

नागपूर शहरात आज दि. 12.06.2019 रोजी मा. पोलीस उप आयुक्त, (वाहतुक) श्री.जी.एस. राजमाने, हे नाईट राऊंड करणार आहे.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर